**<u>अर्जदारांतर्फे सा. क्र. १ यांचा उर्वरित सरतपास त्यांच्यातर्फे वकील श्रीमती पी.पी.धुरी यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>**

१४. माझ्या सरतपासातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. मी प्रस्तुतकामी निशाणी ४ कडील कागद यादीने दिशा लक्ष्मीकांत चौकेकर यांचे मृत्यूप्रमाणपत्र निशाणी १४ कडे व सुभाष शशिकांत वाईरकर यांचे मृत्यूप्रमाणपत्र निशाणी १५ कडे दाखल केले आहे. तसेच मी प्रस्तुतकामी गट विकास अधिकारी पंचायत समिती वेंगुर्ला यांना दिलेल्या अर्जाची मुळप्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>(सदर अर्जास निशाणी १६ देण्यात येते.)</u>** मी प्रस्तुतकामी पंचायत समिती वेंगुर्ला यांनी मला वारस प्रमाणपत्र सादर करण्याबाबत पाठविलेले पत्र दाखल केले आहे. त्यावर गटविकास अधिकारी यांची सही आहे. **<u>(सदर पत्रास निशाणी १७ देण्यात येते.)</u>** मी प्रस्तुतकामी माझे व दिशा लक्ष्मीकांत चौकेकर यांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. **<u>(सदर विवाह नोंदणी प्रमाणपत्रास निशाणी १८ देण्यात येते.)</u>** मी माझा मुलगा चंद्रकांत यांच्या जन्माचा दाखल प्रस्तुतकामी दाखल केला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>(सदर जन्म दाखल्यास निशाणी १९ देण्यात येते.)</u>**

**अधिक सरतपास पूर्ण.**

**(सामनेवालाविरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा असल्याने त्यांच्यातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश करण्यात येतो.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

SOURABH JAYKUMAR CHIVATE

Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE Date: 2025.09.09 16:37:07 +0530

(एस.जे.चिवटे)

दिनांक– ०९/०९/२०२५.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.